दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः

# मासिक ई-मॅगझीन

FEB 2026

## महिना : फेब्रुवारी २०२६

**महाविद्यालयात
आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक,
क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे
मासिक ई-मॅगझीन.**















No : 1234567890000000000







# कष्ट, सातत्य आणि चारित्र्यातूनच उमलतात यशाची स्वप्ने; आयुक्त मानसी मीना

“निरोप म्हणजे रुखरुख नसून नव्या प्रवासाची सुरुवात असते. तुम्ही आता खऱ्या अर्थाने जीवनाच्या मैदानात उतरत आहात. केवळ गुणांच्या शर्यतीत स्वतःला हरवून न घेता, एक संवेदनशील व चांगला माणूस बनण्याला प्राधान्य द्या. चित्तशुद्धी, बुद्धिमत्ता आणि कष्टांचे सातत्य असेल, तर जगातील कोणतीही शक्ती तुम्हाला यशापासून रोखू शकत नाही,” असे प्रेरणादायी प्रतिपादन लातूर महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी मीना यांनी केले.

दयानंद कला महाविद्यालयातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साही व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आयुक्त मानसी मीना उपस्थित होत्या, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते.

मार्गदर्शन करताना आयुक्त मानसी मीना पुढे म्हणाल्या की, “लातूरची ओळख शैक्षणिक गुणवत्तेसाठी संपूर्ण महाराष्ट्रात आहे. तुम्ही या गुणवत्तेच्या परंपरेतून घडलेले विद्यार्थी आहात. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी दूरवर भटकंती करण्याची गरज नाही. स्वतःची ओळख जपा, स्वतःवर विश्वास ठेवा आणि स्वतःला सिद्ध करा.” विद्यार्थ्यांमधील गायन, नृत्य, क्रीडा यांसारख्या सुप्त गुणांची जोपासना करण्याचे आवाहन करत त्यांनी सांगितले की, “आयुष्यात जी कमिटमेंट कराल, तिला पूर्ण ताकदीने सामोरे जा. परीक्षेचा ताण न घेता जे काही कराल, त्यात शंभर टक्के योगदान द्या, कारण श्रमाला कोणताही पर्याय नाही.”

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना आयुक्त मानसी मीना यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आयएएस व आयपीएस होण्यासाठी आतापासूनच तयारी करण्याचा सल्ला दिला. यावेळी त्यांनी एक महत्त्वपूर्ण घोषणा करत सांगितले की, “दयानंद शिक्षण संस्थेतील जो विद्यार्थी आयएएस किंवा आयपीएसची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होईल, त्याच्या पुढील सर्व शैक्षणिक व पालकत्वाची जबाबदारी संस्था स्वीकारेल.”आदर्श नागरिक घडविणारे महाविद्यालय म्हणून दयानंद कला महाविद्यालयाची स्वतंत्र ओळख असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. बारावीच्या सराव परीक्षा, विद्यार्थ्यांना दिले जाणारे मार्गदर्शन यांची माहिती देताना त्यांनी अभिमानाने सांगितले की, “या महाविद्यालयाने आजवर महाराष्ट्राला ३८ दूरचित्रवाणी कलाकार आणि ४२ प्रशासकीय अधिकारी दिले आहेत.”

या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांची विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता कांबळे व संजीवनी कुरे यांनी केले, तर आभार वैष्णवी पाठक हिने मानले.विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी या निरोप समारंभाची अत्यंत उत्साहात सांगता झाली.



# दयानंद कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची मातोश्री वृद्धाश्रमास क्षेत्रभेट - जाणून घेतल्या वृध्दांच्या समस्या




दयानंद कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी शहरातील मातोश्री वृद्धाश्रमास क्षेत्र भेट दिली. आज-कालच्या विभक्त कुटूंब पद्धतीमुळे कौटुंबिक सुखापासून वंचित असणाऱ्या वृध्दांना थोडा वेळ आनंद देण्याचा प्रयत्न केला. दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी मान्यता दिलेला आणि उपप्राचार्य तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अंजली जोशी यांच्या संकल्पनेतून साकार झालेला प्रकल्प भेटीचा हा उपक्रम विद्यार्थ्यांना सामाजिक मूल्य शिकवणारा होता. उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी तसेच प्रा. संजय स्वामी यांनी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यक्तींची ओळख केवळ त्यांच्या मार्कांवरून होत नाही, तर ती त्यांच्या वर्तणुकीतून होत असते, आपल्या घरात तसेच समाजात वृद्ध व्यक्तिंना आदराचे स्थान देणे आवश्यक असल्याचे मत याप्रसंगी बोलताना डॉ अंजली जोशी यांनी व्यक्त केले. वृद्धाश्रमातील एक निवासी माजी प्राध्यापक असणारे श्री. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. प्रा.संजय स्वामी यांनी सामाजिक उपक्रमाचे महत्व सांगितले. मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष,व्यवस्थापक यांचे अनमोल सहकार्य लाभले.

यावेळी विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील वृध्दांच्या विविध समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनी वृद्धांशी संवाद साधुन त्यांच्या मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक समस्यावर चिंतन केले. वृध्दांच्या जीवनातील सुखद आणि कटू अनुभव जाणून घेण्याचा प्रयत्न केला. दिवसभर चाललेल्या या भेटीत वृद्धाश्रमातील आजी-आजोबा भारावून गेले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या अक्टिव्हिटी सादर केल्या. यावेळी दयानंद कला महाविद्यालयातील पदवी आणि पदव्युत्तर समाजशास्त्र विषयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# "भारताच्या आर्थिक उलाढालीत ॲनिमेशनचा मोठा वाटा" – डॉ. जे. एस. दरगड








दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील ॲनिमेशन विभाग व नांदी फाउंडेशन – महिंद्रा प्राईड क्लासरूम (MPC) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप उत्साहात पार पडला. हा प्रशिक्षण कार्यक्रम २ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात आला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जे. एस. दरगड हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांची उपस्थिती अपेक्षित होती, मात्र अपरिहार्य कारणामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी शुभेच्छा संदेश पाठवून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी प्रमुख म्हणून उपस्थित होत्या.

या प्रशिक्षणासाठी मुंबईहून आलेले प्रशिक्षक श्री. हकीम लकडवाला यांनी पाच दिवस विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्सचे सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी ॲनिमेशन विभाग प्रमुख डॉ. दुर्गा शर्मा यांनी नोकरीसाठी सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच विभागातील माजी विद्यार्थ्यांचा रोजगार व यशाचा आढावा उपस्थितांसमोर मांडून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

कार्यक्रमास मान्यवर म्हणून प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी श्री. अनिल बिरादार तसेच IQAC समन्वयक डॉ. संतोष पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ॲनिमेशन विभागात करण्यात आले होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. जे. एस. दरगड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संवाद कौशल्य, टीमवर्क, आत्मविश्वास, नेतृत्वगुण व व्यावसायिक शिस्त या सॉफ्ट स्किल्स करिअरसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले. भारतातील ॲनिमेशन, व्हीएफएक्स, गेमिंग व डिजिटल मीडिया उद्योगाचा देशाच्या GDP मध्ये वाढता वाटा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या क्षेत्रात वेगाने रोजगारनिर्मिती होत असून विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अंजली जोशी यांनी शैक्षणिक ज्ञानासोबत सॉफ्ट स्किल्स आत्मसात केल्यास विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी अधिक व्यापक होतील, असे मत व्यक्त केले. त्याचबरोबर झालेल्या ट्रेनिंग चे सर्टिफिकेट विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी हानी गायकवाड यांनी उपस्थित मान्यवर, प्रशिक्षक, नांदी फाउंडेशन, महिंद्रा प्राईड क्लासरूम आणि सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता गिरी या विद्यार्थिनीने केले. या समारोप कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअर, उद्योगातील संधी आणि कौशल्यविकासाबाबत नवी दिशा मिळाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वृध्दीसाठी दयानंद कला महाविद्यालयात गुलाब पुष्पाने स्वागत







बारावी बोर्ड परीक्षेच्या तणावातून विद्यार्थ्यांनी मोकळा श्वास घ्यावा तसेच आनंदी, तणावमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडाव्यात, या उद्देशाने दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालयात प्रति वर्षाप्रमाणे बारावी बोर्ड परीक्षार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन उत्साहात स्वागतपर कार्यक्रमाचे आयोजन उपप्राचार्य तथा केंद्र संचालक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समितीचे अध्यक्ष ललितभाई शाह व सचिव रमेश बियाणी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. हळुवार सुमधुर बासरीचे सूर, रंगीबेरंगी रांगोळ्यांची आकर्षक आरास, विविध फुग्यांनी सजवलेला परिसर व प्रवेशद्वार यामुळे संपूर्ण महाविद्यालयाचा परिसर मंगलमय झाला होता. या प्रसन्न वातावरणात बारावी बोर्ड परीक्षार्थ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

या स्वागत समारंभासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तृप्ती अंधारे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आत्मविश्वासाने परीक्षा देण्याचा सल्ला दिला. परीक्षेबाबत काही विद्यार्थ्यांच्या मनात अनामिक भीती व हुरहुर असते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावणे, आत्मविश्वास वाढवणे तसेच तणावमुक्त व भीतीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठीच हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित,प्रा. डॉ. दयानंद शिरूरे अधिक्षक श्री संजय व्यास,माजी राज्य मंडळ सदस्य डॉ. संदीपान जगदाळे, डॉ. गोपाल बाहेती, प्रा. जिगाजी बुद्रुके, प्रा. सुधीर गाडवे, प्रा. दशरथ ननावरे व,प्रा महेश जंग्गापल्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी, प्रा. दिनेश जोशी, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. शांता कोटे, प्रा. विलास कोमटवाड, प्रा. अंजली बनसोडे, प्रा. रत्नाकर केंद्रे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयाला SQAAF अंतर्गत 'अ+' श्रेणी प्राप्त




19.01.2026 रोजी दयानंद कला महाविद्यालयात भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि दयानंद कला महाविद्यालय मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त बोलींचा जागर या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भाषा संचालनालयाने बोली जगवा, बोली वाचवा ! संस्कृती टिकवा ! या घोषवाक्यास अनुसरून महाराष्ट्रातील 36 जिल्हयांमध्ये विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. लातूर जिल्हयातून या कार्यक्रमासाठी दयानंद कला महाविद्यालयाची निवड महाराष्ट्र शासनाने केली होती.

सकाळी 09 ते 10.30 या वेळेत ग्रंथ दिंडी आणि शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. कमचारी आणि विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभुषा परिधान करून शिवाजी चौक ते महाविद्यालय असा शोभायात्रेत सहभाग नोंदविला.

बोलींचा जागर या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून देगलूर महाविद्यालय, देगलूर येथील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.विठ्ठल जंभाले आणि महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा येथील डॉ. हंसराज भोसले, उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी उपस्थित होते. मार्गदर्शन करताना डॉ.हंसराज भोसले यांनी महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा भागातील मराठी बोली या विषयावर प्रकाश टाकला. सीमा भागातील बोलींचे स्वरूप, वाक्यप्रचार, म्हणी, शब्दातील लय आणि व्याकरण त्यांनी सप्रमाण सिद्ध करून दाखवले. तर मराठी भाषेतील मराठवाडी बोली या विषयावर डॉ. विठ्ठल जंभाले यांनी मार्गदर्शन केले.

शासनाच्या वतीने निर्धारीत केलेल्या कार्यक्रमानुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोककला कार्यक्रमाचे सादरीकरण केले. यामध्ये पोवाडा, भारूड, शेतकरी गीत आणि पारंपरिक गोंधळ या कला प्रकारांचा समावेश होता. प्रा.अंगद भुरे यांनी मराठवाडा बोलीतील कवितेचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा संचालनालयाचे श्री. भारत जाधव यांनी केले. कार्यक्रमासाठी शासनाचे प्रतिनिधी म्हणून स.या.महाजन आणि राहुल सुर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजक म्हणून प्रा.डॉ.सुभाष कदम यांनी संपूर्ण जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी विभाग प्रमुख डॉ. सुनीता सांगोले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. अंकुश चव्हाण, प्रा.राजू मोरे, प्रा.अंगद भुरे, प्रा.विद्या गिराम, प्रा. स्नेहा वाघमारे, डॉ.दिलीप नागरगोजे, प्रा. प्रशांत दीक्षित

# दयानंद कलाचे विद्यार्थी साहित्योत्सवात रममाण






नुकत्याच संपन्न झालेल्या अखिल भारतीय साहित्य परिषद पुरुस्कृत, साहित्य भारती आणि श्री. सरस्वती भुवन शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने छ.संभाजीनगर येथे ‘साहित्योत्सव’ मध्ये दयानंद कला महाविद्यालयाच्या 40 विद्यार्थी आणि 6 प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. या साहित्योत्सवात सृजनात्मक लेखनाला चालना मिळावी म्हणून विद्यार्थ्यांसाठी निबंध, कविता, कथा, नाट्यछटा इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कविता, कथा व निबंध स्पर्धेत सहभाग नोंदविला. कविता लेखनामध्ये रवी वाघमारे या विद्यार्थ्यास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. साहित्योत्सवात संपन्न झालेल्या विविध सत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवून साहित्यस्वाद घेतला तसेच विविध वक्त्यांना भेटून शंकांचे निरसन करुन घेतले. साहित्योत्सवात मराठवाडा प्रदेश आणि इतर ठिकाणच्या विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. परंतु एकमेव दयानंद कला महाविद्यालयातील सुमारे 40 विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून साहित्यनिर्मितीत भाग घेतल्यामुळे सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे संयोजकाकडून गोड कौतुक करण्यात आले.

या साहित्योत्सवास महाविद्यालयाने साहित्योत्सव शैक्षणिक सहल असे शीर्षक देऊन विद्यार्थ्यांना साहित्यस्वादाची संधी दिली. विद्यार्थ्यांसोबतच मराठी विभागातील डॉ. सुनीता सांगोले, डॉ. अंकुशकुमार चव्हाण, डॉ. सुभाष कदम, प्रा. राजकुमार मोरे, प्रा. अंगद भुरे आणि प्रा. विद्या गिराम इ. प्राध्यापक सहभागी झाले होते. या उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी प्रोत्साहन दिले.

# दयानंद शिक्षण संस्थेत शिवजयंती उत्साहात साजरी; 'दयानंद न्यूज चॅनेल' व 'ई-मॅगझिन'चे दिमाखदार उद्घाटन








दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध विधायक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. या सोहळ्याचे औचित्य साधून दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने तंत्रज्ञान आणि प्रसारमाध्यम क्षेत्रातील नवनवीन उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी बोलताना त्यांनी महाराजांचे विचार आणि त्यांचे व्यवस्थापन कौशल्य आजच्या काळातही कसे मार्गदर्शक आहेत, यावर प्रकाश टाकला.

या सुवर्णक्षणी दयानंद कला महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या 'दयानंद न्यूज चॅनेल'चे श्री. रमेश बियाणी यांच्या हस्ते अधिकृत उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. याचसोबत प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी शिक्षकांना 'ई-सेवा पुस्तिका' प्रदान करण्यात आल्या आणि संस्थेच्या डिजिटल वाटचालीचा भाग म्हणून 'ई-मॅगझिन'चेही प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता अत्यंत उत्साही वातावरणात झाली. डॉ. संदिपान जगदाळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माचा प्रसंग पोवाड्याच्या माध्यमातून जिवंत केला. त्यांच्या पहाडी आवाजातील सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास मा. श्री. जयप्रकाश दरगड, संस्थेच्या विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्राध्यापक व कार्यालयीन सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी विभाग, दयानंद कला महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन सोहळा संपन्न!



दि. २७फेब्रुवारी २०२६ कवी कुसुमाग्रज जयंती अर्थात माय मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दयानंद कला महाविद्यालय मराठी विभागाने ग्रंथ प्रदर्शन, व्याख्यान व काव्य संमेलनाचे आयोजन केले होते. या निमित्ताने कवयित्री समिधा कोळगणे यांना आमंत्रित करण्यात आले होते. नवोदित विद्यार्थी वर्गातील कवी कवयित्रींनी बहारदार कवितांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची उंची गाठली. मातृभाषा मराठीचा गुणगौरव करणाऱ्या कवितांबरोबरच मानवी भाव आंदोलने टिपणाऱ्या कवितांचेही सादरीकरण झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांनी मराठी 'भाषा व्यवहार' म्हणजे केवळ व्याकरण शुद्ध बोलणे नव्हे, तर विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट हेतूने आणि विशिष्ट व्यक्तींशी संवाद साधताना भाषेचा प्रभावी वापर करणे होय. जेव्हा आपण भाषा व्यवहारात आणतो, तेव्हा शब्दांच्या अर्थासोबतच संदर्भ, संकेत आणि सामाजिक शिष्टाचार महत्त्वाचे ठरतात. मराठी भाषा व साहित्याचे सामर्थ्य, उपयोग कथन करताना भाषेचा समर्पक वापर अभिव्यक्ती प्रभावी करतो असे मत प्रतिपादन केले. मराठी भाषा, साहित्य व संस्कृती जतन संवर्धन विषयक जाण विकसित करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला अशी भूमिका स्पष्ट केली.

प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री समिधा कोलगणे यांनी मराठी साहित्य, निर्मितीबाबत आपली भूमिका मांडली. कविता त्यांच्या जीवनप्रवासाच्या साक्षी आहेत असे सांगत कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी साहित्य म्हणजे मनाचा आरसा असतो यावर विवेचन केले. कविता सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि कधी काळी आपण केलेल्या रचनांचा आठव त्यांना झाला. मिश्कील शैलीत विद्यार्थ्यांना मातृभाषेच्या गोडव्याची जाणीव करुन दिली. मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. सुभाष कदम, प्रा. राजू मोरे, प्रा. अंगद भुरे,प्रा. विद्या गिराम, डॉ. सुलक्षणा सरवदे, व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी यांच्या परिश्रमातून कार्यक्रम यशस्वी झाला. या कार्यक्रमात दयानंद कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. काव्य संमेलनात ओमकार सुरवसे, रवी वाघमारे, योगिता गुम्मे, पायल जावळे, देवांश पाचंगे, मधुरा धानोरकर, यश् शिंदे, सुजित कांबळे, अनिकेत बिराजदार, महेश कसबे, प्रियंका कांबळे, पायल माने, अंजली बनसोडे, भाग्यश्री ढोणे, निकिता कांबळे, ऋचा कुलकर्णी, पंकज स्वामी इत्यादी कवी-कवियत्रींनी आपल्या काव्यवाचनाद्वारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. माय मराठीचा काव्यात्मतेचा प्रत्यय, तिच्यातील मधूर गोडवा अभिरुची संपन्न मनात कायम राहील असा घडला.

# दयानंद कला महाविद्यालयात 'फ्युजन 2026' राज्यस्तरीय फॅशन शो स्पर्धा संपन्न . सौ. संगीता लाहोटी यांच्या हस्ते दिमाखदार उद्घाटन





दयानंद शिक्षण संस्था, दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील फॅशन आणि ड्रेस डिझाइन विभागाच्या वतीने भव्य व दिमाखदार 'फ्युजन 2026' राज्यस्तरीय फॅशन शो स्पर्धा दि. 25 फेब्रुवारी 2026 रोजी यशस्वीरित्या संपन्न झाली.

सौ. संगीता लाहोटी यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने या फॅशन शो स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन झाले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. सौ. पद्मा तोष्णीवाल-बियाणी, परीक्षक वसुधा माने, श्रध्दा सोनटक्के (बैंगलोर), संस्था सदस्य विशालजी अग्रवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील, सौ. स्मिता विशाल अग्रवाल, सौ. देवकन्या सागर मंत्री, सौ.निकेता चैतन्य भार्गव, सुश्री शांता जैन, सौ. जयमाला शिवाजी गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

महाराष्ट्रातील 22 महाविद्यालयांमधून 260 युवक-युवतींनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध सत्रे व फेऱ्यांमधून ही स्पर्धा अत्यंत रंगतदार झाली. स्पर्धक विद्यार्थ्यांनी केवळ आकर्षक वेशभूषांची निर्मितीच केली नाही, तर आत्मविश्वासाने कॅटवॉक करत प्रभावी सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. ही स्पर्धा युवक-युवतींसाठी करिअरच्या दृष्टीने अत्यंत प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरली.

संस्थेच्या सुसज्ज सभागृहात नेत्रदीपक प्रकाशयोजना, उत्कृष्ट संगीत संयोजन आणि शिस्तबद्ध नियोजनामुळे हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी व संस्मरणीय ठरला.

या उपक्रमास दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव श्री. रमेशजी बियाणी यांनी शुभेच्छा दिल्या तसेच सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाची मोलाची साथ लाभली.

महाविद्यालयात फैशन आणि ड्रेस डिझाईन विभाग मागील 15 वर्षांपासून बी. ए. व एम. ए. वर्गासाठी अविरतपणे अत्याधुनिक फॅशन आणि ड्रेस डिझाईन विषयाचे शिक्षण देत आहे. येथून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी स्वतःच्या पायावर यशस्वी उद्योजक म्हणून कार्य करीत आहेत. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख प्रा. सुवर्णा लवंद (नाईक), प्रा. हर्षा जैन, प्रा. पल्लवी देशमुख, प्रा. दीपा नीलावार, प्रा. प्रीति बिराजदार, प्रा. मानसी आग्रे प्रा. भाग्यश्री कुलकर्णी आणि फॅशन डिझाइन विभागातील विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीना घुमे व प्रा. सविता कोत्तावार यांनी केले.

स्पर्धकांना प्रथम पारितोषक 11000 रुपये, द्वितीय 7000 व तृतीय 5000 त्याचबरोबर प्रत्येक थीमनुसार प्रथम 1000 द्वितीय 700 व तृतीय 500 असे एकूण 25 भरघोस बक्षिसे, ट्रॉफी व सर्टिफिकेट देण्यात आले. दयानंद कला महाविद्यालयाच्या फॅशन आणि ड्रेस डिझाइन विभागाने साकारलेला हा उपक्रम नेत्रदीपक व अविस्मरणीय ठरला.

# भक्तीच्या सोहळ्यात सेवेचा जागर: दयानंद कला महाविद्यालयाच्या 35 रासेयो स्वयंसेवकांनी जपली सामाजिक बांधिलकी!




टाळ-मृदुंगाचा गजर, 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष आणि भक्तिरसात न्हाऊन निघालेली श्री. क्षेत्र खंडापूर नगरी! निमित्त होते पाच प्रमुख संतांच्या ऐतिहासिक पादुका दर्शन सोहळ्याचे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्यासह इतर प्रमुख संतांच्या पालख्यांचे एकत्रित आगमन झाल्याने संपूर्ण परिसर चैतन्याने दुमदुमून गेला होता. या अभूतपूर्व सोहळ्यासाठी पंचक्रोशीसह दूरदूरहून वारकरी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, लाखो भाविकांच्या या गर्दीला शिस्त लावत आणि 'जन सेवा हीच ईश्वर भक्ती' हा मंत्र जपत लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाच्या ३५ विद्यार्थी स्वयंसेवकांनी आपल्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. या सोहळ्याच्या यशस्वी नियोजनात दयानंदच्या या शिलेदारांनी मोलाचे योगदान दिले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल भुरे, प्रा. सिद्धार्थ भालेराव व प्रा. केंद्रे रत्नाकर यांच्या अचूक नियोजनानुसार, २८ फेब्रुवारी व १ मार्च असे सलग दोन दिवस विद्यार्थ्यांनी खंडापूर येथे प्रत्यक्ष सेवाकार्य केले. विद्यार्थ्यांचे योग्य समन्वय व नेतृत्व करत संपूर्ण सोहळ्यातील सेवा अत्यंत प्रभावीपणे पार पाडण्यात आली.

विद्यार्थ्यांनी यावेळी भाविकांना योग्य मार्गदर्शन करणे, दर्शनासाठी शिस्तबद्ध रांगा लावणे आणि कार्यक्रम स्थळी स्वच्छता राखणे अशा विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पेलल्या. विद्यार्थ्यांच्या या संयमी आणि सेवाभावी वृत्तीमुळेच हा सोहळा निर्विघ्नपणे पार पडू शकला. भक्ती, सेवा आणि सामाजिक जाणिवेचा एक सुंदर संगम या निमित्ताने पाहायला मिळाला. खंडापूर ग्रामस्थ आणि सोहळ्याच्या आयोजकांनी दयानंद कला महाविद्यालयाच्या रासेयो (NSS) स्वयंसेवकांच्या कार्याचे विशेष कौतुक करून त्यांना शाबासकीची थाप दिली आहे.

# मासिक ई-मॅगझीन

## महिना : जानेवारी २०२६


**संपर्क**

**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**

**ईमेल : daclatur@rediffmail.com वेबसाईट : www.daclatur.org**



**आभार**

**या ई-मॅगझीनच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.**